| Publication – Pudhari | Page No. 2 |
|---|---|
| Edition – Print | Date – 10/10/2021 |

# ‘सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर पुरस्कारा’चे वितरण

**मुंबई :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची सहयोगी संस्था असलेल्या श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट ग्रुपच्या ज्युबिलंट भारतीय फाऊंडेशनने ‘आज करो संभव’च्या प्रांशू सिंघल यांना ‘सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर पुरस्कार - इंडिया २०२१’ देऊन गौरवित केले. केंद्र शासनाचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. के. विजय राघवन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. करो संभवमध्ये ई-कचरा, प्लास्टिक पॅकेजिंग कचरा, बॅटरीमधील कचरा आणि काच या प्रकारातील कचऱ्यांचे व्यवस्थापन करण्यावर काम करत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.